**नि.फौ.ख.क्र. ३८/२०१३**

**सरकार –वि– जनार्दन जाधव वगैरे**

**निशाणी क्र. १४०**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ४ ची शपथेवर जबानी.**

नांव – प्रविण विनायक गांगुर्डे

वय – ४८

हुद्दा – सचिव, निवृत्ती पाटील शेळके विविध कार्य. सेवा. सह. सो. लि. बोराळे, ता. चांदवड जि. नाशिक

राहणार – वडनेर भैरव, ता. चांदवड, जि. नाशिक

**सर–तपासणी सरकारतर्फे श्री. आर. एम. वाळके सहा. सरकारी अभियोक्ता**

१. दि.१८.०५.२००६ रोजी मी सचिव म्हणून निवृत्ती पाटील शेळके विविध कार्य. सेवा. सह. सो. लि. बोराळे, ता. चांदवड जि. नाशिक येथे कार्यरत होतो. आज देखील मी त्याच सोसायटीमध्ये सचिव म्हणून कार्यरत आहे. मी फिर्यादी किरण दत्तात्रय पवार यांना ओळखतो. ते आमच्या संस्थेचे सभासद होते. त्यामुळे मी त्यांना ओळखतो. फिर्यादीने आमच्या सोसायटीकडे पिक कर्ज, मध्यम मुदतीचे द्राक्ष मंडप कर्ज, ठिबक संचसाठी कर्ज घेतले होते.

२. दि.१८.०५.२००६ रोजी फिर्यादीने आमच्या सोसायटीचे र.रु.१०,००,०००/– चे कर्ज भरल्याचा दाखला मी फिर्यादीला दिला होता. सदरचे कर्ज आमच्या सोसायटीने फिर्यादीला दि.३०.०६.२००६ रोजी र.रु. ३९,०००/– दिले होते व त्यावर १० लाख रुपयांचा बोजा चढवलेला होता. त्यानुसार फिर्यादीने नोंद क्र. ५८१ अन्वये त्यांच्या मिळकतीवरील आमच्या सोसायटीचा पिक कर्जाचा बोजा उतरवला होता. त्यानंतर दि.०३.०८.२००६ रोजी फिर्यादीने आमच्याकडे मध्यम मुदतीचे द्राक्ष मंडप कर्ज र.रु.४,५३,०००/– व मध्यम मुदत ठिबक संच र.रु. ५४,०००/– असे एकूण र.रु.५,०७,०००/– चे कर्ज घेतले होते. मी

प्रस्तुतकामी निवृत्ती पाटील शेळके विविध कार्य. सेवा. सह. सो. लि. बोराळे चे साधे कर्ज खतावणीचा उताऱ्याची प्रमाणित प्रत व शेअर्स खतवणीचा उताऱ्याची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. ती मला आता दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही व सोसायटीचा शिक्का आहे. त्यांना एकत्रितपणे **निशाणी १४१** देण्यात येते. मी प्रस्तुतकामी फिर्यादीला सदरचे कर्ज सँक्शन केल्याबाबतचे बँकेच्या अटीपत्रकाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी सही व सोसायटीचा शिक्का आहे. त्याला **निशाणी १४२** देण्यात येते. सदर कर्ज दिल्याबाबत गट नं. २६२/१/अ, गट नं. २६२/१/ब, गट नं. २६२/१/क वर नजर गहाण केले होते व तसा नजर गहाण दस्त केला होता व तसा नोंद क्र. ६१८ अन्वये त्या मिळकतींवर द्राक्ष मंडप व ठिबक संचचे मध्यम मुदतीच्या कर्जाचा बोजा चढवला होता. मी प्रस्तुतकामी नोंद क्र. ६१८ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यावर तहसिलदार चांदवड यांची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी १४३** देण्यात येते. सदरचे कर्ज आज अखेर वसुल झाले नाही.

३. त्या कर्जाच्या वसुलीसाठी आम्ही सहकार कायदा कलम १०१ चे प्रकरण दाखल केले होते व सहायक निबंधक सहकारी संस्था चांदवड यांच्याकडून १०१ चा दाखला आम्ही प्राप्त करुन घेतला. त्यानुसार आम्ही कर्ज वसुलीसाठी फिर्यादीच्या घरी गेलो. तेव्हा फिर्यादी मयत झाल्याचे आम्हाला समजले. तसेच संबंधित जमिनीबाबत खरेदी–विक्रीचा व्यवहार झाल्याचे आम्हाला समजले. त्यानंतर आम्ही संचालक मंडळाची दि.०४.०४.२०१२ रोजी बैठक घेतली. त्यामध्ये आम्ही ठराव केला व त्या ठरावामध्ये अशी मागणी केली की, नोंद क्र. ७६८ मुळे आमच्या सोसायटीच्या कर्ज वसुलीला अडचण निर्माण झालेली आहे. संस्थेचा बोजा असतांना खरेदीखत करता येत नाही त्यामुळे ती नोंद रद्द करावी. असा ठराव करुन तो आम्ही उपविभागीय अधिकारी, मालेगाव यांच्याकडे दाखल केला. मला आता निशाणी १२३ कडील ठराव दाखवण्यात आला. तो तोच आहे.

४. उपविभागीय अधिकारी मालेगाव यांनी आर.टी.एस. अपील क्र. ७७/२००९ व अप्पर जिल्हाधिकारी मालेगाव यांनी आर.टी.एस. अपील क्र. ११/२०१३–२०१४ मध्ये दिलेला निकाल आम्हाला प्राप्त झाला. त्या

दोन्ही निकालपत्रांची प्रमाणित प्रत मी प्रस्तुतकामी दाखल केली आहे. त्यांना **अनुक्रमे निशाणी १४४ व १४५** देण्यात येते. सदरचा आदेश हा नोंद क्र. ७६८ रद्द करण्याबाबत दिला होता.

५. मी प्रस्तुतकामी नोंद क्र. ५८१ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्यावर तहसिलदारांची सही व शिक्का आहे. त्याला **निशाणी १४६** देण्यात येते. दि.१८.०५.२००६ रोजी मयत फिर्यादीने आमच्या सोसायटीकडून घेतलेले र.रु.३६,०००/– चे कर्ज फेडले व त्याबाबत मयत फिर्यादीने आमच्या सोसायटीकडून दाखला घेऊन नोंद क्र. ५८१ प्रमाणे त्यांच्या मिळकतीवरील बोजा कमी केला. दि.३०.०६.२००६ रोजी फिर्यादीने घेतलेले र.रु. ३९,०००/– व त्याचा बोजा फिर्यादीच्या मिळकतीवर आजपावेतो कायम आहे. फिर्यादीच्या मिळकतीवर कर्जाचा बोजा अद्याप असल्यामुळे त्याचे खरेदीखत करता येत नाही.

६. सदरचे खरेदीखत करतांना फिर्यादीने दि.१८.०५.२००६ रोजी घेतलेले कर्ज व नोंद क्र. ५८१ चा वापर करुन सदर मिळकतीवर कर्जाचा बोजा असतांनाही आरोपींनी खोटे खरेदीखत करुन घेतलेले आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीचे वकील श्री. जे. के. गुंजाळ यांच्यातर्फे शपथेवर सुरु**

७. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या संस्थेचे फिर्यादी किरण दत्तात्रय पवार हे सभासद होते. हे म्हणणे खरे आहे की, आ.क्र. १ व २ दि.१८.०५.२००६ पासून आजतागायत आमच्या संस्थेचे कोणत्याही प्रकारे सभासद नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या संस्थेने फिर्यादी किरण दत्तात्रय पवार यांना द्राक्ष मंडप व ठिबक संच कर्ज, पिक कर्ज दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी किरण पवार सोबत किंवा स्वतंत्र रितीने आमच्या संस्थेने आ.क्र. १ व २ ला कर्ज दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी किरण पवार विरुद्ध आम्ही वसुलीसाठी सहकार न्यायालयात प्रकरण दाखल केले व त्यानुसार आम्हाला वसुलीचा दाखला मिळाल्याचे मी खोटे कथन केले आहे.

९. हे म्हणणे खरे नाही की, आर.टी.एस. अपील क्र. ७७/२००९ व

आर.टी.एस. अपील क्र. ११/२०१३–२०१४ बाबत मी अपूर्ण माहिती न्यायालयाला दिलेली आहे. फिर्यादीने आ.क्र. १ व २ यांना दस्त क्र. ३७२/२००८ व ३७३/२००८ अन्वये गट नं. २६२/१/ब, गट नं. २६२/१/अ, गट नं. २६२/१/क चे खरेदीपत्र करुन दिल्याचे मला माहित आहे. अप्पर जिल्हाधिकारी मालेगाव यांच्या आर.टी.एस. अपील क्र. ११/२०१३–२०१४ च्या निकालानंतर आ.क्र. १ व २ चे नाव गट नं. २६२/१/ब, गट नं. २६२/१/अ, गट नं. २६२/१/क च्या ७/१२ पत्रकी कसे लागले याविषयी मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर.टी.एस. अपील क्र. ७७/२००९ मध्ये व आर.टी.एस. अपील क्र. ११/२०१३–२०१४ मध्ये दि.०४.०४.२०१२ च्या ठरावानुसार आमची संस्था अर्जदार किंवा सा.वाला नाही.

१०. खरेदीखताबाबत फिर्यादी व त्यांच्या वारसांनी आ.क्र. १ व २ विरुद्ध निफाड येथील वरिष्ठ न्यायालयामध्ये दिवाणी दावा क्र. ६३/२००९ दाखल केला होता हे मला माहित आहे. तो दावा न्यायालयाने नामंजूर केलेला आहे किंवा कसे ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मिळकतीवर बोजा असतांना त्याचे खरेदीपत्र करता येत नाही हे मी खोटे कथन केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, निफाड न्यायालयाच्या निकालानुसार आ.क्र. १ व २ चे नाव मिळकतींच्या ७/१२ पत्रकी लागलेले असून त्यांचे खरेदीपत्र योग्य व कायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आमच्या संस्थेची फसवणूक केलेली असून त्यामध्ये आ.क्र. १ व २ चा काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.06 16:54:08 +0530

**दि. ०६.०३.२०२६**

**(वृषाली दी. सुंगारे)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**

**क.स्तर चांदवड.**